# नांदेड जिल्हयातील कायम विनाअनुदानित अध्यापक महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थ्यांच्या शैक्षणिक समस्या एक चिकित्सक अभ्यास

**डॉ. के.एच. कुलकर्णी**
इंदिरा अध्यापक महाविद्यालय (एम.एड्)
विष्णुपूरी, नांदेड.

**सारांश :-**

*शिक्षणातून आपणास सुजाण, सुसंस्कारित नागरिक घडवायचे आहेत. तेंव्हा असे नागरिक घडविण्यासाठी अध्यापक हा घटक महत्वाचा मानला जातो. त्यासाठी अध्यापकांच्या ज्ञानकक्षा, अनुभव विस्तीर्ण असतो गरजेचे आहेत्र तेंव्हा असे अनुभव, ज्ञान, कौशल्ये अध्यापकांना प्रशिक्षण काळात मिळणे आवश्यक आहे व त्यासाठी अध्यापक महाविद्यालये महत्वाची आहेत.*

*शासनाने कायम विनाअनुदानित धोरणाचा अवलंब शिक्षणक्षेत्रात केला. त्यामध्ये अध्यापक महाविद्यालये सुध्दा सुटली नाहीत. तेंव्हा शासनाच्या अशा धोरणामुळे अध्यपक महाविद्यालयातून निर्माण होणाऱ्या छात्रअध्यापकांना कोणत्या समस्या निर्माण होतात, यावर विचार होणे गरजेचे वाअते. संशोधकाचे पदव्युत्तर (एम.एड) शिक्षण कायम विनाअनुदानित अध्यापक महाविद्यालयातच झाले आहे. तेंव्हा संशोधकाला सुध्दा वेगवेगळया समस्या जाणवून आल्या. तसेच संशोधक गेल्या तेरा वर्षापासून सन (सन २००७) वेगवेगळया कायमविनवा अनुदानित अध्यापक महाविद्यालयातच अध्यापनाचे काम केले आहे. त्यामुळे कायम विनाअनुदानित महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थ्यांच्या समस्येची जाणीव संशोधकाला आहे व त्यासाठी त्यावर उपाययोजनेच्या दृष्टीने प्रयत्न होणे संशोधकाला गरजेचे वाटते.*

*जगाच्या तुलनेत भारताची प्रगती होण्यासाठी आणि सुसंस्कारित, सक्षम नागरिक निर्माण होण्यासाठी शिक्षणाचा उपयोग योग्यरित्या होणे गरजेचे आहे. जागतिकीकरणाच्या आधुनिकतेच्या आणि माहिती संप्रेशणाच्या युगात टिकण्यासाठी शिक्षक प्रशिक्षणार्थ्याचा विकास महत्वाचा आहे.*

*शिक्षक प्रशिक्षणार्थ्याचा विकासासाठी अध्यापक स्वयंपूर्ण असणे गरजेचे आहे. त्यासाठी अध्यापक महाविद्यालयातून विकसित स्वयंपूर्ण परिपूर्ण प्रशिक्षित शिक्षक बाहेर पडणे गरजेचे आहे.*

*प्रस्तूत संशोधनात संशोधकाने असे प्रशिक्षण घेणारे शिक्षक आणि त्यांच्या समस्या महत्वाच्या मानल्या आहे. शासनाच्या कायम विनाअनुदानित धोरणामुळे अध्यापक महाविद्यालये आणि शिक्षक प्रशिक्षणार्थ्यांना कोणत्या अडचणी निर्माण होतात याचा उहापोह करण्याचा संशोधकाने प्रयत्न करुन याचा त्या समस्या दुर करण्याच्या दृष्टीने उपाययोजना सुचविण्याच्या दृष्टीने प्रयत्न केला आहे. तसेच शासनाच्या कायमविनाअनुदानित धोरणांचा ऊहापोह करुन त्याचा योग्य अर्थ जाणून घेऊन त्या दूर करण्याच्या दृष्टीने प्रयत्न केला आहे. करिता सदरील संशोधन महत्वाचे वाटते.*

**प्रस्तावना :-**

**शि**क्षण ही मानवी जीवनात निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. शिक्षणप्रक्रियेत विद्यार्थी ,शिक्षक व समाज या तीन ध्रुवाना महत्वाचे स्थान आहे." कोठारी आयोगाच्या मते शिक्षक हा राष्ट्राचा आधारस्तंभ आहे." शिक्षक हा शिक्षणप्रक्रियेचा कणा आहे. म्हणून शिक्षणप्रक्रियेचा आधारस्तंभ घडविण्याचे कार्य अध्यापक महाविद्यालयातूमन केल्या जाते. माध्यमिक शिक्षण हे पायाभूत शिक्षण मानले जाते. या पायाभूत शिक्षणप्रक्रियेचा आधारभूत घटक अध्यापक महाविद्यालयातून घडविला जातो.

व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगिण विकास हे शिक्षणाचे मुख्य ध्येय आहे. व्यक्मतीमधील सूप्त

शक्तीचा विकास म्हणजे शिक्षण. तेंव्हा व्यक्तीमधील सूप्त शक्ती जाणून त्याचा सर्वांगिण विकासासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे. अध्यापक महाविद्यालयातून बाहेर पडणारे भावी शिक्षकच या देशाचे भवितव्य घडविणार आहेत आणि तेच विद्यार्थ्यांना घडविण्याचा त्यांच्यातील सुप्त शक्ती जाणून घेऊन त्यांच्या विकासाचे कायम करणार आहेत. तेंव्हा विद्यार्थ्यांना, जाणून घेऊन त्यांना घडविण्याचे काम भावी अध्यापकांना करावयाचे आहे. अर्थातच असे भावी अध्यापक परिपूर्ण असणे विकसित असणे स्वयंपूर्ण व स्वावलंबी असणे गरजेचे आहे.

त्यासाठी अध्यापक महाविद्यालये ही शिक्षक प्रशिक्षणार्थ्याच्या विकासासाठी कार्यक्षम असणे गरजेचे आहे. परंतु शासनाच्या कायम विनाअनुदानित धोरणामुळे अशी अध्यापक महाविद्यालये कार्यक्षम आहेत का ? अशा अध्यापक महाविद्यालयातून शिक्षक प्रशिक्षणार्थ्यांच्या विकासासाठी प्रयत्न होतात का ? शिक्षक प्रशिक्षणार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो का ? व त्यामुळे शिक्षक प्रशिक्षणार्थ्यांना कोणकोणत्या समस्या निर्माण होतात या सर्व बाबींवर ऊहापोह होणे महत्वाचे आहे. कारण भावी अध्यापकावरच उज्वल भारताचे भविष्य अवलंबून आहे.

**उद्दिष्टे :-**

१) नांदेड जिल्हयातील कायम विनाअनुदानित अध्यापक महाविद्यालयाचा शोध घेणे.

२) कायम विनाअनुदानित अध्यापक महाविद्यालयातील शिक्षक प्रशिक्षणार्थ्यांच्या समस्या सोडविण्याच्या दृष्टीने उपायोजना सुचविणे.

३) शासनाच्या कायम विनाअनुदानित धोरणाच्या अर्थाचा शोध घेणे.

**गृहितके :-**

१) महाराष्ट्र राज्यात शासनाने सन २००० पासून नवीन अध्यापक महाविद्यालयाची मान्यता ही कायम विनाअनुदानित धोरणावर आधारित दिली आहे.

२) अध्यापक महाविद्यालयातील अभ्यासक्रम हा सैध्दान्तिक व प्रात्याक्षिक या भागावर केंद्रित आहे.

३) अध्यापक महाविद्यालयात किमान भौतिक व मानवी सुविधा या एन.सी.टी.ई. च्या निकषानुरुप आहेत.

**कार्यपध्दत :- संशोधन व्याप्ती व मर्यादा**

प्रस्तूत संशोधनात नांदेड जिल्हयातील कायम विनाअनुदानित महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थ्याचा समावेश करण्यात आला आहे.

**संशोधन पध्दत :-**

सदरील संशोधनासाठी सर्वेक्षण पध्दतीचा वचापर करण्यात आला आहे.

**संशोधनाची साधने :-**

सदरील संशोधनामध्ये सर्वेक्षणासाइी प्रश्नावली व मुलाखत या साधनांचा वापर करण्यात आला आहे. त्यामध्ये (१) प्रशिक्षणार्थ्यांसाठी प्रश्नावनली (२) अध्यापकासाठी प्रश्नावली (३) प्राचार्याची मुलाखत (४) संस्थाचालकांची मुलाखत इ. चा वापर करण्यात येऊन माहिती मिळवली.

**संशोधनाचा न्यादर्श (नमुना निवड) :-**

जिल्हयातील एकूण १० कायम विनाअनुदानित अध्यापक महाविद्यालया मधून २० टक्के म्हणजे २ अध्यापक महाविद्यालयाची निवड लॉटरी पध्दतीने करण्यात आली. तेथील प्राचार्य २ (प्रत्येकी एक ) संस्थाचालक-२(प्रत्येकी एक ), अध्यापक ४ (प्रत्येकी दोन ), प्रशिक्षणार्थी २० (प्रत्येकी दहा) याची निवड करण्यात आली.

**सांख्यिकीय परिमाण :-**

प्रश्नावली व मुलाखतीद्वारे मिळविलेल्या माहितीचा अर्थ संख्याशास्त्रीय परिमाणाद्वारे (सारणी कोष्टक, आलेख इ.) चा वापर करुन वर्गीकरण करुन अर्थ लावण्यात आला व निष्कर्ष काढण्यात आले.

**निष्कर्ष :-**

१) संगणक प्रात्यक्षिकासाठी सुविधा, दृक श्राव्य साधने इ. भौतिक सुविधांचा अभाव दिसून येतो.

२) अध्यापक महाविद्यालयात इतर उपक्रम राबविण्यासाठी विशेष संघटनात्मक प्रयत्न होत नाहीत.

३) संशोधनात्मक कार्याच्या मार्गदर्शनासाठी उच्चशिक्षित अध्यापकाचा अभाव दिसून येतो.
४) शिक्षक प्रशिक्षणार्थ्यांच्या सरावासाठी शाळा उपलब्ध होत नाही त्यामुळे प्रात्यक्षिके पूर्ण होत नाहीत.
५) सैध्दान्तिक व प्रात्यक्षिक भाग काही प्रमाणातच अध्यापक महाविद्यालयात घेतला जातो.

**शिफारशी :-**

१) एन.सी.टी.ई च्या निकषावरुन सुविधा राखण्याचा कटाक्ष पाळावा.
२) अध्यापक प्रशिक्षीत व होतकरु ठेवण्यासाठी संस्थेने पूर्णवेळ नियमित शासनाच्या नियमानुसार अध्यापक वर्ग भरावा.
३) सैध्दान्तिक व प्रात्यक्षिक अभ्यासक्रमाबरोबरच इतर उपक्रम राबविण्यासाठी विशेष प्रयत्न व्हावेत.
४) शासनाने कायम विनाअनुदानित शब्द काढून चांगल्या भौतिक सुविधा व मानवी सुविधा व निकाल चांगले असलेल्या अध्यापक महाविद्यालयांना टप्प्याटप्याने अनुदान द्यावे.
५) संशोधन विषयासाठी व अध्यापन पध्दतीसाठी उच्चशिक्षित व तज्ज्ञ अध्यापकांची नेमणुक करावी.
६) अध्यापकाना अद्यावत ठेवण्यासाठी प्रशिक्षणावर भर द्यावा.
७) सरावासाठी व प्रात्याक्षिकांसाठी संस्थेने स्वतःच्या शाळा उपलब्ध करुन देण्यासाठी पूर्वनियोजन करावे.

**संदर्भ सूचि :-**

१) भिंताडे वि. रा. (१९९४) शैक्षणिक संशोधन, नूतन प्रकाशन, पुणे-२०
२) जोशी, आंबेकर (२०००)आधुनिक भारतीय शिक्षण, सूविचार प्रकाशन,
पूणे.
३) कुंडले म.बा. शैक्षणिक समस्याचा इतिहास नतून प्रकाशन, पुणे.
४) महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (२००६) शिक्षक मार्गदर्शिका, पुणे.

ISSN 2349-638X
www aiirjournal.com